पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 846
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 28 JUL 2021

# परिपत्रक क्रमांक -43

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य /प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना कळविणेत येते की, प्रस्तुत विद्यापीठ स्तरावर दिनांक २१/१२/२०२० रोजी आयोजित केलेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये विषय क्रमांक १२(२) च्या संदर्भात खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक १२(२) | संबंधित महाविद्यालयाकडून अशा विद्यार्थ्यांचे गुण पुराव्यानिशी घेऊन किंवा ज्यांचे पुर्वीचे गुण उपलब्ध नाहीत अशा विद्यार्थ्यांची महाविद्यालयाने तात्काळ परीक्षा घेऊन त्याचे गुण बंद लखोटयामध्ये आल्यानंतर पदवी प्रमाणपत्र वितरीत करण्याची कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले. |

वरील संमत झालेला ठराव विचारात घेता पर्यावरणशास्त्र या विषयाची परीक्षा ज्या ज्या विद्यार्थ्यांनी दिली नाही, अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रस्तुत विद्यापीठाने जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे होणे आवश्यक असून सर्व विषयाच्या प्रश्नपत्रिका ज्या पध्दतीने विद्यापीठ स्तरावरुन वितरित होतात. त्यापध्दतीने पर्यावरणशास्त्र विषयाची देखील प्रश्नपत्रिका विद्यापीठ स्तरावरुन वितरित होणे आवश्यक आहे.

वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता संमत झालेल्या ठरावामध्ये अंशत: बदल करणे आवश्यक असून परीक्षा संदर्भातील सर्व प्रशासकीय प्रक्रिया ही विद्यापीठ स्तरावरुनच करणे उचित ठरणार असल्याने सध्या सुरु असलेल्या सत्रातील पर्यावरणशास्त्र या विषयाची परीक्षा ऑनलाईनव्दारे घेणे आवश्यक असून वरीलप्रमाणे संमत झालेल्या ठरावामध्ये अशंत: बदल करुन पर्यावरणशास्त्र या विषयाची परीक्षा विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार घेण्यास परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिली आहे.

वरीलप्रमाणे अशंत: बदल केलेल्या बाबीच्या अनुषंगाने ज्या ज्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणशास्त्र विषयाची परीक्षा दिली नाही अशा विद्यार्थ्यापैंकी ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरलेला आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा प्रस्तुत विद्यापीठाने जाहिर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाईन होणार असल्याने सदरची बाब आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून देऊन परीक्षा कामामध्ये प्रस्तुत विद्यापीठास सहकार्य करावे.

( डॉ. विकास कदम )
प्र संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१ प्राचार्य, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये / विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

२. प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागातील संगणक विभाग/ पेपर सेटिंग विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर